# आरोग्य सेवा संचालनालय
## (महाराष्ट्र राज्य)
**" आरोग्य भवन ", सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डिमेलो रोड, मुंबई- ४०० ००१**

| कार्यालय | दूरध्वनी | Website : http://arogya.maharashtra.gov.in<br>Email : dhs_2005@rediffmail.com<br>Email : miscall.18@gmail.com |
|---|---|---|
| संचालक (वैयक्तिक ) | २२६२१०३१-३६ | फॅक्स् दूरध्वनी ०२२-२२६२०२३४/२२६२१०३४ (संचालक) |
| सहसंचालक (रुग्णालये-राज्यस्तर) | २२६२१००६ | ०२२-२२६७९०४४ (सहसंचालक (रुग्णालये) |
| सहसंचालक (प्राआकेंद्र-जिपस्तर) | २२६११४७१ | ०२२-२२६२२१५५ (मुख्य प्रशासकीय अधिकारी) |
| सहसंचालक (असंसर्गजन्य रोग) | २२६२०२४९ | ०२२-२२७०३७८५ (नियंत्रण कक्ष) |
| सहसंचालक (खरेदी कक्ष) | २२६२११८६ | ०२२-२२६२१०४७ (अंधत्व) |
| सहसंचालक (अर्थ व आस्थापना) | २२६२६२८२ | ०२२-२२६२५७९९ (खरेदी कक्ष) |
| | २२६२६७५५ | |


9628-9802

जा.क्र.संआसे/विवाह नोंदणी/कक्ष १८/वि.घ.नों / /१६.
दिनांक 5/8 /२०१६.

प्रति,

१) कार्यकारी अधिकारी तथा विवाह निबंधक, बृहन्मुंबई महानगर पालिका, मुंबई
२) आरोग्य अधिकारी तथा विवाह निबंधक, महानगर पालिका (सर्व)
३) प्रशासक तथा विवाह निबंधक, कटक मंडळ (सर्व)
४) मुख्य अधिकारी तथा विवाह निबंधक, नगर परिषद/पालिका (सर्व)
५) प्रशासक तथा विवाह निबंधक, नगर पंचायत (सर्व)
६) ग्राम सेवक/ ग्राम विकास अधिकारी तथा विवाह निबंधक, ग्राम पंचायत (सर्व)

**(मार्फतः- जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद)**

**विषय :- विवाह घटस्फोट/विघटन नोंदणी बाबत मार्गदर्शक सूचना...**

संदर्भ:- १) महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी अधिनियम,१९९८.
२) महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी नियम,१९९९.

महाराष्ट्र विवाह मंडळ व विवाह नोंदणी अधिनियम,१९९८ व त्या अंतर्गत तयार केलेल्या महाराष्ट्र विवाह मंडळ व विवाह नोंदणी नियम,१९९९ नुसार वधु-वराची विवाह नोंदणी करण्याची तरतुद आहे. तसेच एखादया विवाहीत पती-पत्नीचे **घटस्फोट/विघटन** झाल्यास, मा.न्यायालयाकडुन हुकुमनामा त्या पती-पत्नीस दिला जातो. अशा **विवाह घटस्फोट, विघटन इत्यादीची नोंदणी** करणेबाबत महाराष्ट्र विवाह मंडळ व विवाह नोंदणी नियम,१९९९ च्या नियम १० मधील वैधानिक तरतुद खालीलप्रमाणे आहे.

"**१०(१) हिंदू विवाह अधिनियम,१९५५ (१९५५ चा २५) अन्वये करण्यात आलेले हिंदू विवाह व घटस्फोट नियम,१९५५ याच्या नियम (२२) अन्वये** घटस्फोटाच्या प्रत्येक हुकूमनाम्याची,विवाह शून्यवत केल्याच्या किंवा विवाह विघटनाच्या प्रत्येक हुकूमनाम्याची निबंधकास मिळालेली प्रत्येक प्रत त्याच्याकडून विवाह नोंदवहीमध्ये दाखल करण्यात येईल आणि असा विवाह या अधिनिमान्वये नोंदविण्यात आलेला असेल तर अशा हुकूमनाम्याची नोंद समुचित ठिकाणी घेण्यात येईल."

"१०(२) प्रत्येक महिन्याच्या पाचव्या दिवशी किंवा तत्पूर्वी, पुढील नमुन्यामध्ये प्रमाणित प्रतीमधील उतारा महानिबंधकास नोंदणीकृत डाकेने पाठवील.

**घटस्फोट किंवा विवाह शून्यवत करणे किंवा विवाहाचे विघटन करण्याच्या हुकूमनाम्याच्या प्रमाणित प्रतीमधील उतारा**

| पतीचे नाव | निवासाचे ठिकाण | पत्नीचे नाव | निवासाचे ठिकाण | विवाहाचे ठिकाण व तपशील | हुकूमनाम्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |

पक्षकाराने संबधित निबंधकास हुकूमनाम्याची मिळालेली प्रत दिल्यानंतर, निबंधक घटस्फोट/विवाह शून्यवत/ विवाह विघटन या नोंदी त्यांचेकडील वरील नमुन्यातील नोंदवहीमध्ये दाखल करतील. पक्षकार (पती किंवा पत्नी) यांनी उक्त घटनाबाबत रजिस्टरचा उतारा मागितला तर त्यांना प्राप्त करता येईल. यासाठी **घटस्फोट/विवाह शून्यवत/ विवाह विघटन इत्यादी घटनांची नोंद करण्यापूर्वी त्या पक्षकाराची विवाहाची नोंद संबंधित विवाह निबंधकाकडे झालेली असणे आवश्यक आहे.**

महाराष्ट्र विवाह मंडळ व विवाह नोंदणी नियम १९९९ मध्ये घटस्फोट किंवा विवाह शून्यवत करणे किंवा विवाहाचे विघटन बाबत निर्गमित करावयाच्या प्रमाणपत्राचा नमुना विहीत केलेला नाही. जर पक्षकारांना **घटस्फोट/विवाह शून्यवत/ विवाह विघटन इत्यादी** घटनाबाबत प्रमाणपत्राची मागणी केल्यास, संबंधित पती व पत्नीस सोबत जोडलेल्या नमुन्यात प्रमाणपत्र देण्यास हरकत नाही.

विवाह घटस्फोट/विघटन बाबतच्या नोंदणी करताना पक्षकारांकडून (पती किंवा पत्नी) किमान खालील कागदपत्रे आवश्यक राहील.

अ) विधिवत विवाह घटस्फोट/विघटन (Decree of Divorce / Seperation) बाबतचे न्यायालयीन आदेशाची प्रत.

ब) पती व पत्नी यांचे आधार कार्ड (असल्यास), आणि कायमच्या निवासाचा पुरावा.

क) पती व पत्नी यांचे फोटोग्राफ्स (४ प्रती)

**घटस्फोट/विवाह शून्यवत/ विवाह विघटन इत्यादीच्या** प्रमाणपत्राच्या ४ मुळ प्रती कराव्यात. एक प्रत स्थळप्रत म्हणुन त्यांचे कार्यालयात, दुसरी प्रत महानिबंधकास नोंदणीकृत डाकेने पाठवावी व उर्वरीत दोन प्रती पती व पत्नी या दोघांना देण्यात यावे

**सहपत्र** :- प्रमाणपत्राचा मसुदा जोडत आहे.

30/7/16

संचालक, आरोग्य सेवा, तथा निबंधक,
विवाह मंडळ व विवाह नोंदणी (राज्यस्तर),
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत सादर :-

१) मा.अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) मा.अप्पर मुख्य सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) मा.अप्पर मुख्य सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रत सस्नेह :-

१) आयुक्त, राजस्व विभाग ................................(सर्व)
२) आयुक्त, महानगर पालिका .............................(सर्व)
३) जिल्हाधिकारी, ..........................................(सर्व)
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,...............(सर्व)
५) उप संचालक आरोग्य सेवा, आरोग्य मंडळ, .............(सर्व)

प्रत :- जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद,...................(सर्व) यांना उचित कार्यवाहीसाठी.